**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**जाहिरात**

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील मुंबई अग्निशमन दलाच्या आस्थापनेवरील पीबी-१, रु. ५२०० - २०२०० अधिक १९५० ग्रेड पे अधिक अनुज्ञेय भत्ते या वेतनश्रेणीतील **अग्निशामक**'' या संवर्गातील रिक्त असलेली पदे सरळसेवेने Walk-in- Selection पध्दतीने भरावयाची आहेत.

| एकूण पदे | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७७४ | ९८ | ६१ | २१ | १२ | २६ | १४ | १७० | १३ | ३५९ |

वरील एकूण अनुशेषावर खालीलप्रमाणे समांतर आरक्षण असेल.

| अ.क्र. | जात प्रवर्ग | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | महिला | सर्वसाधारण आरक्षण | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ.जा. | १५ | ०५ | ०५ | ०२ | २९ | ४२ | ९८ |
| २ | अ.ज. | ०९ | ०३ | ०३ | ०१ | १८ | २७ | ६१ |
| ३ | वि.जा.(अ) | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०६ | ०९ | २१ |
| ४ | भ.ज. (ब) | ०२ | ०१ | ०१ | - | ०४ | ०४ | १२ |
| ५ | भ.ज.(क) | ०४ | ०१ | ०१ | ०१ | ०८ | ११ | २६ |
| ६ | भ.ज.(ड) | ०२ | ०१ | ०१ | - | ०४ | ०६ | १४ |
| ७ | इ.मा.व. | २५ | ०८ | ०८ | ०३ | ५१ | ७५ | १७० |
| ८ | वि.मा.प्र. | ०२ | ०१ | ०१ | - | ०४ | ०५ | १३ |
| ९ | खुला | ५४ | १८ | १८ | ०७ | १०८ | १५४ | ३५९ |
| | एकूण | ११६ | ३९ | ३९ | १५ | २३२ | ३३३ | ७७४ |

टिप - उपरोक्त संवर्गातील अनुशेषांतर्गत पदांमध्ये माजी सैनिकांसाठी १५टक्के, खेळाडूसाठी ५ टक्के, मुंबई महानगरपालिकेच्या प्रकल्प अंतर्गत बाधित ५ टक्के , भूकंपग्रस्त २ टक्के, महिलांसाठी ३० टक्के, आरक्षण याची पदे शासन निर्देश संदर्भित करुन त्यातील अटीनुसार पदे भरण्यात येतील.

अर्हता-

| | |
|---|---|
| १. | उमेदवार मान्यताप्राप्त शिक्षण मंडळाची कला, विज्ञान, किंवा वाणिज्य शाखेतील इयत्ता १२ वी किमान ५० टक्के गुणांसह प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण असावा. |
| २. | उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाण पत्र परिक्षेत किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| ३. | वैद्यकीय दर्जा- उमेदवार शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सुदृढ असावा. सर्व प्रकारच्या संसर्गजन्य रोगांपासून मुक्त असावा. |
| ४. | उमेदवाराकडे खालील नमूद केलेला किमान शारीरिक दर्जा असणे आवश्यक आहे.<br>उंची - किमान १७२ सें.मी.(पुरुषांसाठी), उंची- किमान १६२ सें.मी. (महिलांसाठी)<br>छाती - ८१ सें.मी. (साधारण) व ८६ सें.मी. (फुगवून) (महिलांसाठी छातीची अट लागू नाही.)<br>वजन - किमान ५० कि.ग्रॅम<br>दृष्टी - चष्मा किंवा तत्सम साधनाशिवाय नेहमीची (सामान्य). वर्णांन्धता आजारापासून मुक्त असावा. |
| ५. | वयोमर्यादा- उमेदवाराचे वय दिनांक ०१.०८.२०१६ रोजी २० वर्षापेक्षा कमी व २५ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवार, युध्दात मृत्यू पावलेल्या सैनिकांच्या कुटुंबनिवृत्ती वेतनावर अवलंबून असलेले उमेदवार, माजी सैनिक व महानगरपालिका कर्मचा-यांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ०५ वर्षानी शिथिल करण्यात येईल. खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल करण्यात येईल. माजी सैनिकांसाठी सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी वयोमर्यादा राहिल. |
| ६. | जड वाहन चालविण्याच्या वैध परवाना असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. |
| ७. | महानगरपालिकेतर्फे घेण्यात येणा-या व्यवसाय/शारीरिक चाचणीत उमेदवार उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अशाच उमेदवारांचा त्यांच्या गुणवत्तेनुसार निवडीकरीता विचार करण्यात येईल. |
| ८ | संगणकीय ज्ञान -उमेदवार ''डि.ओ.ई.ए.सी.सी.' सोसायटीचे 'सी.सी.सी.' किंवा ' ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर' किंवा 'सी' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी.' किंवा ' जी.ई.सी.टी. ' चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा महाराष्ट्र शासन या संदर्भात वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल अशी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तथापि, अर्ज सादर करताना सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नसल्यास निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी.' ची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. |

**<u>उमेदवारांनी टक्केवारीनुसार भरतीसाठी हजर राहावयाचे ठिकाण.</u>**

बृहन्मुंबई महानगरपालिका, बोरिवली प्रादेशिक समादेश केंद्र. बोरिवली अग्निशमन केंद्र, डॉन बास्को हायस्कूलच्या जवळ, गोराई रोड, मुंबई -४०००९१

**<u>उमेदवारांनी टक्केवारीनुसार भरतीसाठी हजर राहावयाचे वेळापत्रक</u>**

| अ.क्र. | जात प्रवर्ग | १२ वी परिक्षेची गुणांची टक्केवारी | उमेदवाराची उंची | अर्जाच्या नमुन्यात माहिती भरुन मुळप्रमाणपत्रासह भरतीसाठी हजर राहवयाचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|
| १) | खुला (समांतर आरक्षणासहीत) | उपरोक्त परिक्षेत ६०% किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उमेदवार | पुरुष उमेदवार १७२ सें.मी.किंवा त्यापेक्षा जास्त महिला उमेदवार १६२ सें.मी. किंवा त्यापेक्षा जास्त | दि. १९.०८.२०१६ सकाळी ८.००वाजेपर्यंत |
| | खुला (समांतर आरक्षणासहीत) | उपरोक्त परिक्षेत ५०% ते ५९.९९% गुण प्राप्त केलेले उंमेदवार | पुरुष उमेदवार १७२ सें.मी.किंवा त्यापेक्षा जास्त महिला उमेदवार १६२ सें.मी. किंवा त्यापेक्षा जास्त | दि. २०.०८.२०१६ सकाळी ८.००वाजेपर्यंत |
| २) | अ.जा. (समांतर आरक्षणासहीत) | उपरोक्त परिक्षेत ५० % किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उंमेदवार | पुरुष उमेदवार १७२ सें.मी.किंवा त्यापेक्षा जास्त. महिला उमेदवार १६२ सें.मी. किंवा त्यापेक्षा जास्त. | दि. २३.०८.२०१६ सकाळी ८.००वाजेपर्यंत |
| ३) | अ.ज. (समांतर आरक्षणासहीत) | उपरोक्त परिक्षेत ५० % किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उंमेदवार | पुरुष उमेदवार १७२ सें.मी.किंवा त्यापेक्षा जास्त महिला उमेदवार १६२ सें.मी. किंवा त्यापेक्षा जास्त | दि. २४.०८.२०१६ सकाळी ८.००वाजेपर्यंत |
| ४) | वि.जा.(अ) (समांतर आरक्षणासहीत) | उपरोक्त परिक्षेत ५० % किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उंमेदवार | पुरुष उमेदवार १७२ सें.मी.किंवा त्यापेक्षा जास्त महिला उमेदवार १६२ सें.मी. किंवा त्यापेक्षा जास्त | दि. २५.०८.२०१६ सकाळी ८.००वाजेपर्यंत |
| ५) | भ.ज. (ब) (समांतर आरक्षणासहीत) | उपरोक्त परिक्षेत ५० % किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उंमेदवार | पुरुष उमेदवार १७२ सें.मी.किंवा त्यापेक्षा जास्त महिला उमेदवार १६२ सें.मी. किंवा त्यापेक्षा जास्त | दि. २६.०८.२०१६ सकाळी ८.००वाजेपर्यंत |
| ६) | भ.ज. (क) (समांतर आरक्षणासहीत) | उपरोक्त परिक्षेत ५० % किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उंमेदवार | पुरुष उमेदवार १७२ सें.मी.किंवा त्यापेक्षा जास्त महिला उमेदवार १६२ सें.मी. किंवा त्यापेक्षा जास्त | दि. २७.०८.२०१६ सकाळी ८.००वाजेपर्यंत |
| ७) | भ.ज. (ड) (समांतर आरक्षणासहीत) | उपरोक्त परिक्षेत ५० % किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उंमेदवार | पुरुष उमेदवार १७२ सें.मी.किंवा त्यापेक्षा जास्त महिला उमेदवार १६२ सें.मी. किंवा त्यापेक्षा जास्त | दि. २९.०८.२०१६ सकाळी ८.००वाजेपर्यंत |
| ८) | विमाप्र (समांतर आरक्षणासहीत) | उपरोक्त परिक्षेत ५० % किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उंमेदवार | पुरुष उमेदवार १७२ सें.मी.किंवा त्यापेक्षा जास्त महिला उमेदवार १६२ सें.मी. किंवा त्यापेक्षा जास्त | दि. ३०.०८.२०१६ सकाळी ८.००वाजेपर्यंत |
| ९) | इ.मा.व. (समांतर आरक्षणासहीत) | उपरोक्त परिक्षेत ६०% किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उमेदवार | पुरुष उमेदवार १७२ सें.मी.किंवा त्यापेक्षा जास्त महिला उमेदवार १६२ सें.मी. किंवा त्यापेक्षा जास्त | दि. ३१.०८.२०१६ सकाळी ८.००वाजेपर्यंत |
| | इ.मा.व. (समांतर आरक्षणासहीत) | उपरोक्त परिक्षेत ५०% ते ५९.९९% गुण प्राप्त केलेले उंमेदवार | पुरुष उमेदवार १७२ सें.मी.किंवा त्यापेक्षा जास्त महिला उमेदवार १६२ सें.मी. किंवा त्यापेक्षा जास्त | दि. ०२.०९.२०१६ सकाळी ८.००वाजेपर्यंत |

(**टिप**-उमेदवारांना टक्केवारीनुसार ज्या दिनांकाला बोलविण्यात आलेले आहे त्याच दिनांकाला हजर राहणे आवश्यक आहे. इतर दिवशी हजर राहिल्यास त्याला भरतीप्रक्रीयेत सहभागी होता येणार नाही.)

**<u>निवडीचे निकष व कार्यपद्धती</u>**

अ) महानगरपालिकेतर्फे घेण्यात येणाऱ्या शारिरीक, शैक्षणिक व व्यवसाय चाचणीत उमेदवारांना उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांचा त्यांच्या गुणवत्तेनुसार निवडीकरीता विचार करण्यात येईल.

ब) उमेदवारांना मैदानी चाचणी व प्रमाणपत्र चाचणीत मिळालेले गुण (शैक्षणिक अर्हतांचे गुण वगळून) अशा एकूण गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्तेप्रमाणे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. तथापि, दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास धारण केलेली उच्च शैक्षणिक अर्हता/उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक/जाहिरातीमध्ये नमूद केलेली प्राधान्यशिल अर्हता/अनुभव असल्यास अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास धारण करीत असलेल्या विहित अनुभवाचा कालावधी/ तरीही समान गुण प्राप्त झाल्यास उमेदवाराच्या जन्मदिनांकानुसार वयोजेष्ठतेने प्राधान्यक्रम देण्यात येईल याप्रमाणे अटी विचारात घेतल्या जातील. निवड झालेल्या उमेदवारांमधून रिक्त असलेल्या पदांच्या उपलब्धतेनुसार अग्निशमन शल्य चिकित्सक यांच्याकडे वैद्यकीय तपासणीस पाठविण्यात येईल. वैद्यकीय तपासणीत पात्र झालेल्या उमेदवारांना मुंबई अग्निशमन दलाच्या प्रशिक्षण केंद्रावर, मुंबई अग्निशमन दलाच्या पाठ्यक्रमानुसार ६ महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षणादरम्यान अग्निशामक उमेदवारास दरमहा रू. ३०००/- (रुपये तीन हजार फक्त) इतके पाठ्यवेतन देण्यात येईल. बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची सदर पदासाठी निवड झाल्यास तो ज्या खात्यात कार्यरत होता त्या खात्यामार्फत प्रशिक्षण कालावधीसाठी त्याचे वेतन काढण्यात येईल. प्रशिक्षण कालावधीमध्ये तीन चाचणी परिक्षा व अंतिम मैदानी व लेखी परिक्षा घेण्यात येईल. एकत्रित सर्व परिक्षा मिळून सरासरी ५० टक्के गुणांनी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अनुत्तीर्ण झाल्यास शेवटची संधी म्हणून प्रशिक्षण कालावधी तीन महिन्यापर्यंत वाढविण्यात येईल व वाढीव प्रशिक्षण कालावधीत घेण्यात येणा-या एक चाचणी व अंतिम लेखी व मैदानी परिक्षेत एकत्रित ५० टक्के गुणांनी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अन्यथा सदर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व पुन्हा संधी दिली जाणार नाही. प्रशिक्षण वाढविण्यात आलेल्या उमेदवाराला त्याच्या वाढीव प्रशिक्षण कालावधीत कोणतेही पाठयवेतन देण्यात येणार नाही व त्यांना वाढीव प्रशिक्षण विनापाठयवेतन करावे लागेल. भरतीच्या निवडीच्या वेळची गुणवत्ता यादीत प्राप्त केलेले गुण ५० टक्के व प्रशिक्षण कालावधीत प्राप्त केलेले गुण ५० टक्के (गुणांची बेरीज करुन) यासह सेवाजेष्ठता तयार करुन उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल. तसेच त्यांचे आरक्षण भरतीच्या गुणवत्ता यादीतील आरक्षणानुसारच राहील.

क) अग्निशामक या पदाकरीता उच्च गुणवत्ताधारक मागासप्रवर्गाच्या उमेदवारांची खुल्या पदांवर नेमणूक करण्यात येईल.

ड) उमेदवार शारिरीक मानके, शैक्षणिक अर्हतांचे निकष व भरती प्रक्रियेतील विविध चाचण्या पूर्ण करणा-या उमेदवारांचीच (पात्र उमेदवारांची)कार्यालयीन नोंद ठेवण्यात येईल व भरती प्रक्रियेत अपात्र ठरणा-या उमेदवारांची कोणत्याही प्रकारची नोंद करण्यात येणार नाही.

इ) उमेदवारांना निवडीच्या वेळी व्यावसायिक चाचणी द्यावी लागेल.

पुरुष /महिला उमेदवारांची २२० गुणांची विभागणी खालीलप्रमाणे असेल.

(१)

| | |
|---|---|
| १. मैदानी चाचणी | एकुण १२० गुण |
| २. प्रमाणपत्र चाचणी | एकुण १०० गुण |
| | एकुण २२० गुण |

| **शारीरिक पात्रता – पुरुष** | **शारीरिक पात्रता – महिला** |
|---|---|
| अ) उंची -किमान १७२ सें.मी. | अ) उंची -किमान १६२ सें.मी. |
| ब) छाती -८१ सें.मी.(साधारण) ८६ सें.मी. (फुगवून) | ब)वजन-किमान ५० कि.ग्रॅम |
| क) वजन -किमान ५० कि.ग्रॅम | |

(२) **<u>मैदानी चाचणी – पुरुषांसाठी</u>**

शारिरिक मोजमापणीत पात्र आढळलेल्या शैक्षणिक अर्हताधारण करणाऱ्या व वयोमर्यादेत बसणाऱ्या उमेदवारांची पुढीलप्रमाणे मैदानी चाचणी घेण्यात येईल. मैदानी चाचणीमध्ये पात्र होण्याचे नियम पुढीलप्रमाणे आहेत.

अ) **३ मिनीटांमध्ये** ८०० मीटर्स अंतर धावणारे उमेदवार पुढील चाचणीस पात्र होतील.

ब) **१९ फुट** उंचीवरुन **जंपिंग शिटमध्ये** उडी मारणारे उमेदवार पुढील चाचणीस पात्र होतील.

क) जमिनीपासुन **३३ फूट** उंचीवरील खिडकीस लावलेल्या (४६.४' वरील उंचीच्या) **(४० गुण)** ॲल्युमिनियम एक्सटेन्शन शिडीवर खिडकीपर्यंत वर चढून त्याच शिडीने खाली उतरावे लागेल. (आरंभ रेषेपासून शिडी २० फूट अंतरावर असेल.)

| वेळ (सेकंदांमध्ये ) | गुण |
|---|---|
| २० सेकंदांपेक्षा कमी | ४० गुण |
| २०.१ सेकंद ते ३० सेकंदांपर्यंत | २५ गुण |

| | |
|---|---|
| ३०.१ सेकंद ते ४० सेकंदांपर्यंत | १० गुण |
| ४० सेकंदांपेक्षा जास्त | शून्य गुण |

ड) ५० किं. ग्रॅम वजनाची मानवाकृती खांद्यावर घेऊन दिलेल्या चौकोनी मार्गाने ६० मीटर अंतर धावणे. **(४० गुण)**

| वेळ (सेकंदांमध्ये ) | गुण |
|---|---|
| २० सेकंदांपेक्षा कमी | ४० गुण |
| २०.१ सेकंद ते ३० सेकंदांपर्यंत | २० गुण |
| ३०.१ सेकंद ते ४० सेकंदांपर्यंत | १० गुण |
| ४० सेकंदांपेक्षा जास्त | शून्य गुण |

इ) २० फुट उंचीपर्यंत रस्सीवर चढणे व उतरणे ( रस्सीवर चढतेवेळी फक्त हाताचा वापर करणे बंधनकारक राहील. पायाचा वापर करता येणार नाही केल्यास शून्य गुण मिळेल) सदर रस्सी पुर्ण चढल्यास ३० गुण, ३/४ चढल्यास २० गुण, १/२ चढल्यास १० गुण तसेच अर्ध्यापेक्षा कमी अंतर चढल्यास शून्य गुण दिले जातील. **(३० गुण)**

ई) उमेदवारास २० पुल अप्स **(१० गुण)**

(प्रत्येक पुल-अपला अर्धा गुण याप्रमाणे २० पुल अप्स पूर्ण केल्यास १० गुण देण्यात येतील.)

**३) <u>मैदानी चाचणी - महिलांसाठी</u>**

शारीरिक मोजमापणीत पात्र आढळलेल्या शैक्षणिक अर्हताधारण करणाऱ्या व वयोमर्यादित बसणाऱ्या उमेदवारांची पुढीलप्रमाणे मैदानी चाचणी घेण्यात येईल. मैदानी चाचणीमध्ये पात्र होण्याचे नियम पुढीलप्रमाणे आहेत.

**अ)** **४ मिनीटांमध्ये** ८०० मीटर्स अंतर धावणारी उमेदवार पुढील चाचणीस पात्र होतील.

**ब)** **१९ फुट** उंचीवरुन **जंपिंग शिटमध्ये** उडी मारणारी उमेदवार पुढील चाचणीस पात्र होतील.

**क)** जमिनीपासुन **३३ फूट** उंचीवरील खिडकीस लावलेल्या (४६.४’ वरील उंचीच्या) ॲल्युमिनियम एक्सटेन्शन शिडीवर खिडकीपर्यंत वर चढून त्याच शिडीने खाली उतरावे लागेल. **(४० गुण)**

(आरंभ रेषेपासून शिडी २० फूट अंतरावर असेल.)

| वेळ (सेकंदांमध्ये ) | गुण |
|---|---|
| ३०सेकंद किंवा ३० सेकंदांपेक्षा कमी | ४० गुण |
| ३०.१ सेकंद ते ४० सेकंदांपर्यंत | ३० गुण |
| ४०.१ सेकंद ते ५० सेकंदांपर्यंत | २० गुण |
| ५०.१ सेंकद ते ६० सेकंदांपर्यंत | १० गुण |
| ६० सेकंदांपेक्षा जास्त | शून्य गुण |

**ड)** **४० किं. ग्रॅम वजनाची मानवाकृती खांद्यावर घेऊन दिलेल्या चौकोनी मार्गाने ६० मीटर अंतर धावणे.** **(४० गुण)**

| वेळ (सेकंदांमध्ये ) | गुण |
|---|---|
| २५ सेकंद किंवा २५ सेकंदांपेक्षा कमी | ४० गुण |
| २५.१ सेकंद ते ३५ सेकंदांपर्यंत | २० गुण |
| ३५.१ सेकंद ते ४५ सेकंदांपर्यंत | १० गुण |
| ४५ सेकंदांपेक्षा जास्त | शून्य गुण |

**इ)** **गोळा फेक (४ कि.ग्रॅ.)** **(१० गुण)**

| अंतर | गुण |
|---|---|
| ६ मीटर व त्यापेक्षा जास्त | १० गुण |
| ५ मीटर ते ६ मीटरपेक्षा कमी | ०७ गुण |
| ४ मीटर ते ५ मीटरपेक्षा कमी | ०४ गुण |
| ४मीटर पेक्षा कमी | शून्य गुण |

**ई)** **लांब उडी** **(१५ गुण)**

| अंतर | गुण |
|---|---|
| १५फूट व त्यापेक्षा जास्त | १५ गुण |
| १२ फूट ते १५ फूटापेक्षा कमी | १० गुण |
| ०९ फूट ते १२ फूटापेक्षा कमी | ०५ गुण |

| | |
|---|---|
| ०९ फूटापेक्षा कमी | शून्य गुण |

**फ) पुश अप (जोर काढणे) (१५ गुण)**

(प्रत्येक पुश अपला एक गुण याप्रमाणे १५ पुश अप पूर्ण केल्यास १५ गुण देण्यात येतील.)

**४) प्रमाणपत्र चाचणी (पुरुष व महिला)**

अ) राष्ट्रीय / राज्याच्या गृहविभागाकडून मान्यताप्राप्त संस्थेकडून अग्निशामक, दुय्यम अधिकारी व तत्सम मान्यताप्राप्त अभ्यासक्रम प्रमाणपत्रधारकास( अग्निशामक व तत्सम प्रमाणपत्रधारकास १० गुण, दुय्यम अधिकारी अभ्यासकम व तत्सम प्रमाणपत्रधारकास १५ गुण, देण्यात येतील. **(२५ गुण)**

ब) राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूस १० गुण व राज्य स्तरावरील खेळाडूस ०६ गुण व जिल्हा पातळीवरील खेळाडूस०४ गुण देण्यात येतील. **(२० गुण)**

**(टिप : जास्त वेळ सहभागी खेळाडूस जास्त गुण देण्यात येणार नाहीत.)**

क) एन.सी.सी. चे प्रमाणपत्र **(२० गुण)**

'सी' प्रमाणपत्र - १० गुण, 'ब' प्रमाणपत्र - ६ गुण,

'अ' प्रमाणपत्र ४ गुण (शालेय पातळीवरील M.C.C. प्रमाणपत्र)

ड) जडवाहनचालक प्रमाणपत्र **(१० गुण)**

(दिनांक ०१.०९.२०१६ रोजी किमान १ वर्षापुर्वीचे)

इ) i) नागरी सेवादलाच्या अग्निशमन अभ्यासकमाचे प्रमाणपत्र ०६ गुण **(१० गुण)**

ii) होमगार्डमध्ये कमीत कमी ३ वर्षे सेवा केल्याचे प्रमाणपत्र ०४ गुण

ई) सरकारी/निमसरकारी संस्था यांच्यकडे समुद्रकिना-यावर जीवरक्षक म्हणून ०१ वर्षे सेवा असल्यास किंवा मुंबई अग्निशमन दलात कंत्राटी जीवरक्षक म्हणून किमान सहा महिने सेवा असल्यास- **(१५ गुण)**

<u>सर्व साधारण अटी –</u>

१. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणुका करण्यात येतील. तथापि, निवड यादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत. जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर कोणत्याही व्यक्ती/संस्था यांच्याकडून प्राप्त झालेल्या निवेदनांचा विचार केला जाणार नाही अथवा पत्रोत्तर दिले जाणार नाही.

२. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या आणि अनुशेष बदलण्यासापेक्ष आहे.

३. अर्ज विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टीने पूर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपुर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

४. अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे समोरुन काढलेले छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह वैयक्तिक माहितीपत्रावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच छायाचित्राच्या चार अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रकियेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.

५. वैयक्तिक माहितीपत्रासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे (छायांकित प्रतीसाठी वापरण्यात येणाऱ्या) ए-४ आकारातील असावे.

६. अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचाऱ्याला भरतीसाठी हजर रहावयाचे असेल तर त्याने त्याच्या खातेप्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

७. पत्र व्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पुर्ण असावा.

८. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरीता विचार केला जाणार नाही.

९. भरतीसाठी उपस्थित राहण्यापूर्वी उमेदवारांनी पदांच्या अर्हता व अटी पुर्ण करीत असल्याची खातरजमा करावी. उमेदवार विहित अर्हता व अटी पुर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल, नेमणुक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल.

१०. उमेदवाराने जन्मदाखला / जन्म तारखेचा पुरावा, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्र, व्यवसायिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र, क्रिडा व इतर प्रमाणपत्र, चालक परवाना, संबंधित गुणपत्रिका, सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेली जाती प्रमाणपत्र, असल्यास अनुभवाचे प्रमाणपत्र यांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या छायांकित प्रतीसह भरतीसाठी उपस्थित रहावे. उमेदवार भूकंपग्रस्त , प्रकल्पग्रस्त असल्यास (मुंबई महानगरपालिका प्रकल्पांतर्गत ग्रस्त) सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करावे. माजी सैनिक असल्यास सक्षम प्राधिकां-यांकडून विमुक्ती प्रमाणपत्र आवश्यक आहे. विवाहित महिलांच्याबाबतीत विवाह नोंदणी प्रमाणपत्र,नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे. किंवा त्यांच्या लग्नापूर्वीच्या नावाने अर्ज करुन शकतात.

११. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यांत शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरूद्ध पोलिस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे. निवडीनंतर त्याबाबत माहिती झाल्यास त्यास सेवेतून कमी करण्यात येईल.

१२. निवड झालेल्या उमेदवारांची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापुर्वी सदर पदाच्या १ महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल किंवा तशा अर्थाचे ( आशयाचे) हमीपत्र सादर करावे लागेल. उमेदवाराने प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतर अग्निशामक म्हणून मुंबई अग्निशमन दलामध्ये किमान ५ वर्षे सेवा करणे बंधनकारक राहील. त्यापुर्वी नोकरी सोडल्यास त्याला १ महिन्याच्या वेतनाएवढी अनामत रक्कम व प्रशिक्षणासाठी झालेला खर्च रू. ४८०/- प्रतीदिन याप्रमाणे महानगरपालिकेकडे भरपाई करावी लागेल असे लेखी हमीपत्र रू.१००/- कोर्ट स्टॅम्प कागदावर द्यावे लागेल.

१३. उमेदवारास Walk-in- Selection च्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. तसेच उमेदवारांना स्वत: सोबत जेवणाचे डबे व खाण्याची व्यवस्था स्वत: करावी लागेल.

१४. व्यवसायिक चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराला बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकिय चाचणी (Medical Test) उत्तीर्ण व्हावे लागेल.

१५. उमेदवाराची वाणी शुद्ध असावी , तोतरेपणा नसावा.

१६. निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही अग्निशमन केंद्रात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा मुंबई महानगरपालिकेच्या कोणत्याही अग्निशमन केंद्रात बदली योग्य असेल.

१७. निवड प्रकिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्बबादल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१८. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नांव नोंदणी केलेली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत अर्जासोबत जोडावी.

१९. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्ती नंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम, १९९९ लागू होतील. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू होईल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे बृहन्मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम १९५३) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

२०. सदर भरती अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवासातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

२१. खुल्या प्रवर्गातील तसेच इ.मा.व. वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड),विमाप्र या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती/कुटुंबातील महिला यांना आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

२२. वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड) या प्रवर्गाकरीता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

२३. अ.जा. आणि अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागास प्रवर्गातील तसेच खुला वर्गातील महिला उमेदवारांनी ते उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे नविनतम प्रमाणपत्र भरतीच्या वेळस सादर करणे आवश्यक आहे.

२४. शासन निदेशानुसार निवड झालेल्या मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र नियुक्तीनंतर सहा महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

२५. उमेदवाराला निवड प्रकियेच्या वेळेस मोबाईल फोन आणण्यास मनाई आहे.

२६. शारीरिक चाचणीस येताना उमेदवाराने कोणतेही उत्तेजक / मादक द्रव्य (Dope) सेवन करू नये. उत्तेजक /मादक द्रव्य (Dope) सेवन केलेले आढळल्यास त्याची उमेदवारी रद् केली जाईल.

२७. शारीरिक चाचणीच्या दिनांकात / वेळेत बदल करण्याची उमेदवाराची कोणतीही विनंती स्विकारार्ह असणार नाही.

२८. शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या पुरुष उमेदवारास मैदानी परिक्षेसाठी हाफ पँन्ट व बनियन परिधान करणे आवश्यक राहील. व महिला उमेदवारास मैदानी परिक्षेसाठी गोल गळयाचा टी शर्ट व फुल ट्रॅक पॅन्ट परिधान करणे आवश्यक आहे.

२९. मैदानी चाचणीमध्ये इजा होऊ नये म्हणून उमेदवाराने कॉनव्हासचे शूज / स्पोर्टस् शूजचा वापर करावा.

३०. व्यावसायिक चाचणी दरम्यान उमेदवारास मार लागल्यास अथवा जीवघेणी दुखापत झाल्यास ती त्या उमेदवाराची जबाबदारी राहील.त्याबाबत नुकसान भरपाई दिली जाणार नाही. तसेच सदर निवड चाचणी कोणत्याही टप्प्यावर पूर्ण करु न शकल्यास त्या उमेदवारास पुढील चाचणीमध्ये कोणतेही गुण दिले जाणार नाही व त्यास त्याच टप्प्यावर अपात्र करण्यात येईल.

३१. सरळसेवा भरती अंतर्गत अग्निशामक या संवर्गाकरिता महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास त्याच प्रवर्गातील पुरुष उमेदवार घेण्यात येतील.

३२. मुंबई अग्निशमन दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासणीसाठी प्रशिक्षण कालावधीमध्ये देण्यात येणा-या वेगवेगळया प्रशिक्षण पध्दतीत अपात्र ठरल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

३३. सदर पदासाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धांमध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धात प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण,रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू तसेच राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रिडा प्राविण्य मिळविणा-या

उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा विचार केला जाणार नाही. राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये (NCC)अंडर ऑफिसरची रँक मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती.

३४. स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे नामनिदेर्शित शासन निर्देशानुसार उपलब्ध झाल्यास त्यांचा विचार प्राधान्याने करण्यात येईल.

३५. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

३६. खुल्या वर्गातील महिला व अन्य समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांनी संबंधित समांतर आरक्षणाच्या दृष्टीकोनातून शासकीय निर्देशानुसार सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकित छायाप्रती आणणे आवश्यक आहे.

३७. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवास स्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**विशेष सुचना –**

१. यापुर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

२. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याने किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

३. मध्यस्थ / ठग / मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

४. निवड प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे सर्वाधिकार म.न.पा. आयुक्तांकडे राहतील.

५. सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

६. सदर जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

७. मागासवर्ग आरक्षणांतर्गत अग्निशामक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी त्यांच्याकडे जातवैधता प्रमाणपत्र नसल्यास संबंधित जात पडताळणी समितीकडे जातीचा दावा तपासणीकरिता सादर करण्यासाठी शासन निर्णयानुसार आवश्यक असलेला अर्ज व त्यासोबत संबंधित कागदपत्रे दयावी लागतील.

**सही/-**
**प्रमुख अग्निशमन अधिकारी**
**मुंबई अग्निशमन दल**

**सही/-**
**उप-आयुक्त (म.ख.खा.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**वैयक्तिक माहितीपत्र (Bio Data)**

अग्निशामक पदाकरिता

| |
|---|
| उमेदवाराने त्याचे अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वत:ची स्वाक्षरी करावी. २.५ से.मी. x ३ से.मी. |

१) (अ) संपूर्ण नांव (मराठीत) :

आडनाव

नांव

वडिलांचे/पतीचे नांव

(ब) वडिलांचे/पतीचे संपूर्ण नांव : श्री ————————————————————————

(क) विवाहित महिलांच्या बाबतीत त्यांचे विवाहापूर्वीचे संपूर्ण नांव-

(ड) विवाह नोंदणी प्रमाणपत्र-

२) (अ)पत्ता (पिन कोड सहित)-

(ब) दूरध्वनी क्रमांक-

भ्रमणध्वनी(मोबाईल) क्रमांक–

(क) ई मेल आय डी –

३) लिंग- पुरुष/महिला

४) (अ) उमेदवार सामाजिक आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छितो किंवा नाही. होय/नाही होय असल्यास.

(ब) प्रवर्ग- जात- पोटजात-

(क) जात वैधता प्रमाणपत्र आहे/नाही

(ड)उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र - आहे/नाही

(इ) समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी (√) असे चिन्ह करा

| महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(ई) स्त्री उमेदवार महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिते का? होय /नाही

५) (अ)जन्मदिनांक :- दिनांक महिना वर्ष

| दिनांक | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**(ब)** दि. ०१.०८.२०१६ रोजी वय- वर्षे महिने दिवस

६) (अ)शैक्षणिक अर्हता :

| शैक्षणिक अर्हता | प्राप्त झालेले गुण | | मंडळ/विद्यापिठाचे नांव |
|---|---|---|---|
| | एकूण /पैकी | मराठी एकूण /पैकी | |
| एस.एस.सी | | | |
| एच.एस.सी | | | |
| पदवी परिक्षा | | | |

(सोबत गुणपत्रिकेची प्रत जोंडण्यात यावी).

(ब)संगणक विषयक ज्ञान- एम.एस.सी.आय.टी. किंवा होय/नाही
शासनाने विहित केलेला संगणक विषयक अभ्यासक्रम

७) शारिरीक पात्रता : उंची : —— सें.मी. वजन : —— कि.ग्रॅम
छाती- फक्त पुरुष उमेदवारांसाठी - साधारण—— से.मी. फुगवून - —— से.मी.
वर्ण : ———— नेत्र /वर्ण : ————— वैयक्तिक खूण : ————

८) अनुभव (असल्यास प्रमाणपत्राची प्रत जोडावी) ————————————-

९) (अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? ———— होय/नाही—————
(ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. ————————————–

१०) (अ) उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का ? —————होय/नाही————
(ब) असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा . ————————————-

११) (अ) सध्या अर्जदार इतरत्र नोकरीत आहे का ? ————होय/नाही—————
(ब) असल्यास त्याबाबतचा तपशील देऊन सध्याच्या नियोक्त्याचे ‘ना हरकत’ प्रमाणपत्र जोडावे. ————————————–

१३) (अ)स्वातंत्र्यसैनिक किंवा स्वातंत्र्यसैनिकांचा नामनिर्देशित वारस आहे का ? ————होय/नाही—————
असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. ————————————-
(ब) राष्ट्रीय / राज्य / जिल्हा स्तरावरील खेळाडू आहे काय ? —————होय/नाही————
असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा.
(क) एन.सी.सी.चे प्रमाणपत्र / त्याबाबतचा तपशील द्यावा. ————होय/नाही—————
(ड) राष्ट्रीय / राज्याच्या मान्यताप्राप्त विद्यापीठाकडून अग्निशामक अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे काय ? —————होय/नाही————
असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा.
(इ) जड वाहनचालक परवाना आहे काय ? /त्याबाबतचा तपशील द्यावा. ———होय/नाही—————(प्रत जोडावी)
(फ) होमगार्डमध्ये कमीत कमी ३ वर्ष सेवा केल्याचे प्रमाणपत्र / ————————————–
असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. (प्रत जोडावी)
ग) समुद्रकिना-यावर जीवरक्षक असल्याचे पत्र———————–होय/नाही (प्रत जोडावी)

मी, यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास तसेच उपरोक्त दिलेल्या माहितीच्या आधारे नियुक्ती झालेली असल्यास सेवेतून कमी केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार रहाणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

स्थळ- अर्जदाराची सही /-
दिनांक : (अर्जदाराचे नांव)

सोबत: खालीलप्रमाणे प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रत जोडलेली आहेत. असल्यास त्यापुढे (√) असे चिन्ह करा

१. राष्ट्रीय / राज्य / जिल्हा स्तरावरील खेळाडू असल्याचे प्रमाणपत्र ☐
२. एन.सी.सी.चे प्रमाणपत्र
३. राष्ट्रीय / राज्याच्या मान्यताप्राप्त विद्यापीठाकडून अग्निशामक/केंद्र अधिकारी ☐

अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र. ☐

४. जड वाहनचालक परवाना.

५. होमगार्डमध्ये कमीत कमी ३ वर्ष सेवा केल्याचे प्रमाणपत्र ☐

६. शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र. एस.एस.सी/एच.एस.सी./विज्ञान विषयाची पदवी ☐

७. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. ☐

८. शालांत परीक्षा (एस.एस.सी.) मराठी विषय१०० गुणांसह घेऊन उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. ☐

९. जातीचे प्रमाणपत्र/जातवैधता प्रमाणपत्र

☐

१०.उन्नत व प्रगतगटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र.

११.विवाह नोंदणी प्रमाणपत्र- ☐

१२.समुद्रकिना-यावर जीवरक्षक असल्याचे पत्र